राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृटया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: ७ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/ तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७

४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक २१/०६/२०१७

५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक ११/०८/२०१७

६) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.१३/शिक्षण, दि.२१/८/२०१७

७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १३/०९/२०१७

८) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) परिपत्रक क्रमांक उशिसं/२००४-०५/ ईबीसी/१४जी, दिनांक १७.२.२००५

प्रस्तावना :

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वरील संदर्भ क्र.२, ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या खालील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विहित अटी व शर्तींनुसार शासकीय व शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठांसह) व खाजगी विनाअनुदानित (खाजगी

अभिमत/स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थी वगळून) शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते.

अ.क्र	विभागाचे नांव	अभ्यासक्रम
१.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	**पदविका:** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी **पदवी:** अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र. **पदव्युत्तर पदवी:** मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कॉम्प्युटर अप्लिकेशन
२.	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	**पदवी:**एम.बी.बी.एस.,बी.डी.एस.,बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.,बी.यु.एम.एस.,बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच. व नर्सिंग
३.	कृषी विभाग	**पदविका :**कृषी **पदवी :** कृषी व संलग्न विषय, फलोत्पादन, जैव तंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, शेती व्यवस्थापन **पदव्युत्तर पदवी :** कृषी व संलग्न विषय
४.	पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग	**पदविका:** दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, पशुसंवर्धन व्यवस्थापन. **पदवी:** प्राणिशास्त्र व पशुसंवर्धन, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान **पदव्युत्तर पदवी:** प्राणिशास्त्र

२) वरील पैकी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसिन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या अभ्यासक्रमांसाठी शासकीय, शासन अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) महाविद्यालयांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेणाऱ्या व सध्या विविध शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी (व्यवस्थापन कोटयातील प्रवेश वगळून) ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थी वगळून) संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते.

तसेच या वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख पेक्षा जास्त व रु. ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थी वगळून) त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यन्तची रक्कम ही वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस अदा करण्यात येते.

३) शासनाने वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये उपरोक्त नमूद "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारी लाभाची रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्याच्या आधारसंलग्नीत बँक खात्यात संबंधित प्रशासकीय विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून जमा करण्याचा देखील शासनाने यापूर्वी निर्णय घेतला आहे.

४) शासनाने वरील संदर्भ क्र.६ येथील दिनांक २१/०८/२०१७ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीतील विविध व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी उपरोक्त प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकरीता या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील नमूद अभ्यासक्रमांना सध्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीतील काही अभ्यासक्रम सद्य:स्थितीत राज्यातील अकृषी विद्यापीठात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले असून याची यादी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये नमूद केली आहे. याशिवाय संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेले जे अभ्यासक्रम सध्या विविध महाविद्यालयात कार्यान्वित आहेत, परंतु यापैकी ज्या अभ्यासक्रमांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकरीता असलेल्या प्रचलित योजनेंतर्गत लाभ देण्यात येत नाही, अशा अभ्यासक्रमांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केली आहे. सबब, प्रचलित योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याना सध्या ज्या अभ्यासक्रमांसाठी लाभ देण्यात येतो अशा अभ्यासक्रमांशिवाय वरील परिशिष्ट "ब" येथील अभ्यासक्रमांसाठी देखील या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लाभ देण्यासाठी या अभ्यासक्रमांचाही नव्याने प्रचलित योजनेत समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

५) तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय, अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विनाअनुदानित) महाविद्यालयांमधील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये २.५० लाख इतकी केली आहे. सध्या शासकीय, अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विना अनुदानित) महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमासाठी सदरची उत्पन्न मर्यादा असणाऱ्या या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क आकारण्यात येत नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षरित्या शासनाकडून शिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. तथापि, सदरची वरील वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये २.५० लाख वरुन रुपये ६.०० लाख इतकी करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

६) तसेच सध्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील केवळ शासकीय व अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विना अनुदानित) महाविद्यालयातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीच प्रचलित शिष्यवृत्ती मर्यादीत असून त्याची व्याप्ती वाढवून शासकीय/अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील - विना अनुदानित) संस्थांशिवाय कायम विना अनुदानित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांकरीताही लागू करण्याबाबत शासन स्तरावर विचार सुरु होता.

७) याशिवाय नव्याने समाविष्ट होणाऱ्या अभ्यासक्रमांपैकी उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासकीय/अशासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील-विना अनुदानित) महाविद्यालये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमधील अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या १०० टक्के शिष्यवृत्ती देण्याची बाब विचाराधीन होती. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय / अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे त्यांना प्रचलित पध्दतीनुसार शिक्षण शुल्काच्या १०० टक्के व ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती देण्याची बाब विचाराधीन होती. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील कायम विना अनुदानित महाविद्यालयांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती लागू करणे देखील शासनाच्या विचाराधीन होते.

८) वरील संदर्भ क्र. ८ येथील परिपत्रकातील तरतूदीनुसार सध्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याने या संस्थांना रु. १७०/- (रु. १२५/- प्रयोगशाळा शुल्क व रु. ४५/- इतर शुल्क) प्रति विद्यार्थी इतकी प्रतिपूर्ती करण्यात येते. तसेच टप्पा अनुदानावरील उपरोक्त दराने प्रतिपूर्तीशिवाय पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रति विद्यार्थी अनुक्रमे रु. ४००/- व रु. ८००/- प्रति विद्यार्थी इतकी प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. परंतु वरील परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित सुधारित दराने शिष्यवृत्ती विद्यार्थ्यास थेट लाभ स्वरुपात हस्तांतरण (DBT) द्वारे यापुढे देण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे अनुदानित/टप्पा अनुदानावरील संस्थांना सध्या देण्यात येणारी प्रतिपूर्ती बंद करण्याचे विचाराधीन होते.

९) तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील सर्व विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्र शिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, इत्यादींकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तचे व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता १०० टक्के परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची बाब विचाराधीन होती.

१०) शासनाने वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांकरीता डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून लागू केली आहे. तथापि, नव्याने वरीलप्रमाणे समाविष्ट होणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचा देखील समावेश हा डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत करण्याचा व त्यानुसार या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून देण्याचे विचाराधीन होते.

११) तसेच ज्या विद्यार्थ्यांचे पाल्य अल्प भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांचे कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी) अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्षातील १० महिन्याकरीता शिक्षणासाठी निर्वाह भत्ता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

१२) यानुसार मंत्रिमंडळाने दिनांक १०/०८/२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार वित्त विभागाच्या सहमतीने सदर शासन निर्णय निर्गमित करण्याचे प्रस्तावित होते.

शासन निर्णय:

प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकरीता या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील नमूद अभ्यासक्रमांना सध्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या यादीतील काही अभ्यासक्रम सद्य:स्थितीत अकृषी विद्यापीठात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले असून याची यादी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये नमूद केली आहे. याशिवाय संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयामध्ये नमूद केलेले जे अभ्यासक्रम सध्या विविध महाविद्यालये/विद्यापीठात कार्यान्वित आहेत, परंतु यापैकी ज्या अभ्यासक्रमांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्याकरीता असलेल्या प्रचलित योजनेंतर्गत लाभ देण्यात येत नाही, अशा अभ्यासक्रमांची यादी परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केली आहे. सबब, प्रचलित योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सध्या ज्या अभ्यासक्रमांसाठी लाभ देण्यात येतो अशा अभ्यासक्रमांशिवाय परिशिष्ट "ब" येथील अभ्यासक्रमांचाही नव्याने प्रचलित योजनेत समावेश करण्यात येत आहे.

२) या विभागांतर्गत येणाऱ्या <u>उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" मधील अभ्यासक्रमांसाठी-</u>

(अ) सध्या केवळ शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित) महाविद्यालयातील व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमधील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच मर्यादित असलेल्या शिष्यवृत्तीची व्याप्ती वाढवून शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित) महाविद्यालये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांशिवाय, कायम विना अनुदानित महाविद्यालयातील अभ्यासक्रमांकरीताही (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) सदर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येत आहे.

(ब) शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान -विनाअनुदानित) कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल

घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रु. २.५० लाख वरुन रु. ६.०० लाख करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(क) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील वरील परिच्छेद-१ येथे नमूद केल्याप्रमाणे प्रचलित तसेच नव्याने समाविष्ट होणा-या अभ्यासक्रमांकरीता खालीलप्रमाणे लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे -

(१) शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित)/ कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रांमध्ये (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देय राहील.

(२) मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय/ अशासकीय अनुदानित अभ्यासक्रमांना शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार व व्यवस्थापन कोटा असल्यास या कोटयातील प्रवेश वगळून उर्वरित जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा कमी आहे, त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के शिष्यवृत्ती देय राहील. तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देय राहील.

(३) तसेच मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विनाअनुदानित) व कायम विना अनुदानित अभ्यासक्रमांना शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देय राहील.

(४) उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत अभ्यासक्रमांकरीता या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती पुढीलप्रमाणे देय राहील :-

उत्पन्न मर्यादा	शुल्क प्रकार	अभ्यासक्रम			
		शासकीय	अशासकीय अनुदानित	अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानित - विनाअनुदानित)	कायम विनाअनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रम					
रु.२.५० लाख पर्यंत	शिक्षण शुल्क	१००%	१००%	५०%	५०%
रु.२.५० लाख ते रु.६ लाखापर्यंत	शिक्षण शुल्क	५०%	५०%	५०%	५०%
बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम					
रु.६ लाखापर्यंत	शिक्षण शुल्क	१००%	१००%	१००%	१००%

३) उपरोक्तप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीता प्रस्तावित सुधारित दराने शिष्यवृत्ती विद्यार्थ्यास यापुढे थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे देण्यात येणार असल्याने यापूर्वीची वरील संदर्भ क्र.८ येथील परिपत्रकानुसार प्रचलित उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शिष्यवृत्ती योजना अधिक्रमित करण्यात येत असून शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (विनाअनुदानित - टप्पा अनुदान) महाविद्यालयांना रु. १२५/- प्रयोगशाळा शुल्क (विज्ञान विधी शाखेसाठी) व रु. ४५/- (ग्रंथालय शुल्क रु.१०/-, जिमखाना शुल्क रु.२०/- व इतर शुल्क रु.१५/-) प्रति ईबीसी पात्रताधारक विद्यार्थ्याकरीता देण्यात येणारी प्रतिपूर्ती यापुढे देय राहणार नाही. तसेच या प्रतिपूर्तीशिवाय अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान-विनाअनुदानित) महाविद्यालयांना प्रति ईबीसी पात्रताधारक विद्यार्थ्याकरीता पदवी (रु.४००/-) व पदव्युत्तर पदवी (रु.८००/-) देण्यात येणारी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीही यापुढे देय राहणार नाही.

४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील तंत्र शिक्षण संचालनालय व कला संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील / संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील

विद्यार्थ्यांकडून शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल. तसेच या संचालनालयाच्या अखत्यारितील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाने विहित केलेल्या प्रवेश प्रक्रीयेचा अवलंब करुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून सक्षम प्राधिकरणाने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल.

५) याचप्रमाणे अन्य प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित, अंशत: अनुदानित (अनुदानाच्या टप्प्यावरील) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसीन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) हे अभ्यासक्रम वगळून उर्वरित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल. तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शासनाने विहित केलेल्या प्रवेश प्रक्रीयेचा अवलंब करुन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या १०० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल.

६) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित, अंशत: अनुदानित (अनुदानाच्या टप्प्यावरील) व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून) मान्यता प्राप्त एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसीन अँड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (व्यवस्थापन कोटयातील संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात देण्यात येईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त

व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयानुसार अदा करण्यात येईल.

७) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा देण्यात येणारा लाभ हा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमांसाठीच मर्यादित असेल.

८) तसेच सदरच्या सुधारीत राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विविध प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्र शिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, इत्यादींकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तचे व शासन मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरीता १०० टक्के परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विद्यार्थ्यांना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) तसेच शासनाने वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांशिवाय सदरच्या सुधारीत योजनेनुसार वरीलप्रमाणे नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना देखील प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून लागू करण्यात येत आहे.

१०) याशिवाय ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी) अभ्यासक्रमांसाठी, शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता प्रतिमाह खालील नमूद दराप्रमाणे निर्वाह भत्ता अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अभ्यासक्रम	शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता अनुज्ञेय निर्वाह भत्ता
व्यावसायिक अभ्यासक्रम (अल्प भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूरांचे पाल्य वगळून)	रु. ३०००/-
बिगर व्यावसायिक	रु.२०००/-
उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी)	रु.१०००/-

तथापि, वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांना निर्वाह भत्याचा लाभ मिळणार असल्यामुळे यांना पुन्हा सदरच्या नवीन निर्वाह भत्ता योजनेचा लाभ मिळणार नाही.

योजनेंतर्गत लाभाच्या पात्रतेसाठी अटी व शर्ती -

११) सदर योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१७-१८ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवासधारक व वादग्रस्त महाराष्ट्र - कर्नाटक सीमा क्षेत्रातील विद्यार्थ्यांसह जे विद्यार्थी विहित अटी व शर्तींची पूर्तता करतील अशा सर्व पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल. यानुसार योजनेची अंमलबजावणी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अखत्यारितील संचालनालयांनी करावी. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलव्दारे ऑन-लाईन पध्दतीने करण्यासाठी संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१२) तसेच सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र प्रत्येक इच्छुक लाभार्थ्याने अर्जासमवेत सादर करणे आवश्यक असेल.

१३) सदर प्रयोजनार्थ लाभाकरिता दरवर्षी अर्ज करताना त्यासंबंधीत शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न विचारात घेऊन किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र पालकांच्या प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा कमी आढळून आल्यास / बोगस आढळून आल्यास सदर प्रमाणपत्र निर्गमित करणारे अधिकारी, संबंधित विद्यार्थी आणि पालकाविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

१४) सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबंधीत विद्यार्थ्यास कुटूंबाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र देताना त्या विद्यार्थ्याच्या पालकांचे (आई व वडिल यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न विचारात घ्यावे. तसेच ज्या

विद्यार्थ्यांचे आई-वडिल (पालक) हयात नसल्यामुळे उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्यास अडचण असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी संबंधीत शैक्षणिक संस्थानी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची तपासणी करुन त्याप्रमाणे पात्रतेकरीता प्रमाणित करुन योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांस सर्व कागदपत्रांसह शिफारस करावी. अशा प्रकारे प्राप्त शिफारशींच्या आधारे प्रकरणनिहाय तपासणी करुन योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने अशा अनाथ विद्यार्थ्यांना योजनेच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र द्यावे.

१५) सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल.

१६) या योजनेचा लाभ हा दूरस्थ पध्दतीने (Open / Distance / Virtual Learning) अथवा अर्धवेळ (Part-time) स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

१७) सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या निवडक पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी राज्यातील विद्यापीठे / तंत्र शिक्षण मंडळ/ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांना संलग्नित असलेल्या शासकीय, शासन अनुदानित, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील- विनाअनुदानित) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, शासकीय विद्यापीठे आणि शासकीय /अनुदानित अभिमत विद्यापीठ (स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे व खाजगी अभिमत विद्यापीठे वगळून) या मध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित राहिल.

१८) तसेच लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम संस्थांची (AICTE /PCI /COA /MCI /NCTE, विद्यापीठ / शिक्षण मंडळ, इत्यादी) पूर्व मान्यता व संलग्नता असणे आवश्यक असेल.

१९) वरीलप्रमाणे नव्याने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांपैकी व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधित अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाने प्रवेश प्रक्रीयेकरीता नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकरणाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) / शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या पध्दतीनुसार प्रवेश घेणे बंधनकारक असेल.

२०) शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल.

२१) सदर योजनेच्या लाभाकरीता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विदयापीठ यांचेबाबतीत शासनाने निर्धारित केलेली व अन्य सर्व खाजगी अंशत: अनुदानित (टप्पा अनुदानावरील) व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्याबाबतीत संबंधित अधिनियमातील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकरणाने प्रत्येक वर्षी निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या

आधारे अनुज्ञेय मर्यादेपर्यंतची रक्कम, विहित परीक्षा शुल्क आणि निर्वाह भत्ता हा वरील संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयात नमूद केलेल्या पध्दतीनुसार पात्र लाभार्थी विद्यार्थ्याच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

२२) सदर योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी किमान ५० टक्के उपस्थिती आवश्यक असून सदरची उपस्थिती ही आधारसंलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक असेल. तथापि, संबंधित विद्यापीठ/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ /महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या प्रचलित नियमानुसार त्यांनी परीक्षांसारख्या अन्य विविध प्रयोजनार्थ विहित केलेल्या उपस्थितीच्या प्रमाणाची स्वतंत्रपणे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी पूर्तता करणे आवश्यक असेल.

२३) या प्रयोजनार्थ शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थांसह अन्य सर्व शैक्षणिक संस्थांना संस्थेतील बायोमेट्रीक उपस्थित प्रणालीवर संस्थेतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्याची दैनंदिन उपस्थिती पारदर्शीपणे नोंदविणे आवश्यक असेल. याकरीता वरील संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेत नव्याने समाविष्ट होणाऱ्या संबंधित महाविद्यालयांना देखील त्यांच्या परिसरात आधार संलग्नीत STQC (Standardization Testing and Quality Certification) व UIDAI (Unique Identification Authority of India) प्रमाणित बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून स्वखर्चाने स्थापित करणे बंधनकारक असेल. दरम्यानच्या कालावधीत संबंधित महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर यापूर्वी स्थापित केलेल्या प्रचलित बायोमेट्रीक / अन्य उपस्थिती प्रणालीवर संबंधित विद्यार्थ्यांची नोंदविलेली दैनंदिन शैक्षणिक उपस्थिती विचारात घ्यावी.

२४) अर्जदार विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधीत प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील उपसंचालक / सहसंचालक वा सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहिल.

२५) पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकारीता या योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहिल. तथापि, तद्नंतर पुनश्च: त्या सत्रात/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: उत्तीर्ण (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

२६) परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरीता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

२७) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शुल्क शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

२८) ज्या अभ्यासक्रमांकरीता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या/तिच्याकडून वसूल केली जाईल.

२९) लाभार्थी विद्यार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विद्यार्थ्याला/संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही अन्य योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास लाभ मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

३०) सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्था (NAAC, NBA इ.) मूल्यांकन/ पुर्नमूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यंत सक्षम शिखर संस्था / यंत्रणा/ मंडळाकडून असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation) आवश्यक राहील. तद्नंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित सक्षम शिखर संस्था/मंडळाकडून (NAAC, NBA इ.) मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मानांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांचे मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत अशा शैक्षणिक संस्थांना योजनेतून वगळण्यात येईल. तद्नंतर केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये नव्याने प्रथम / थेट व्दितीय वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहील.

३१) या योजनेंतर्गत व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी किमान ५० टक्के विद्यार्थ्यांना नोकरीची संधी (Placements) मिळवून देण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/ तंत्रनिकेतन यांची राहील.

३२) सदर योजनेमध्ये व त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

शिष्यवृत्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-

३३) या योजनेंतर्गत सध्या लाभ घेत असलेले व नवीन प्रत्येक पात्र इच्छुक अर्जदार विद्यार्थ्याने सदर प्रयोजनार्थ शासनाने माहिती तंत्रज्ञान संचालनालय मार्फत विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टल वर ऑन-लाईन पध्दतीने अर्ज सादर करणे अनिवार्य असेल. या महाडिबीटी पोर्टलचा वापर करुनच अर्ज करण्यापासून ते रक्कम खात्यात जमा करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया करणे अनिवार्य राहिल.

३४) महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ अन्वये विभागाने दिनांक १३/०४/२०१७ रोजी राजपत्रात प्रसिध्द केलेली शासन अधिसूचना (असाधारण क्र.८७) व वरील संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार ऑन-लाईन अर्जासोबत पात्र इच्छुक अर्जदारानी त्यांचा आधार क्रमांक देणे आवश्यक असेल. तसेच ज्या बँक खात्यात पात्र लाभार्थ्यांना रक्कम प्राप्त करुन घ्यावयाची आहे, असे खाते ऑन-लाईन अर्जासोबत दिलेल्या आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करणे आवश्यक असेल. शासनाने सदर प्रयोजनार्थ विहित केलेल्या पध्दतीनुसार संबंधित शैक्षणिक संस्थेने व सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रीया अवलंबणे आवश्यक असेल. याकरीता सर्व संबंधित विद्यापीठे/शिक्षण मंडळाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य संबंधित प्रशासकीय विभागानी माहिती तंत्रज्ञान संचालनालयास करणे अनिवार्य असेल.

३५) सक्षम प्राधिका-यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विद्यार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियामक प्राधिकरण अथवा सक्षम प्राधिकरणाने वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

३६) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

३७) प्रत्येक प्रवर्गातील अर्जदार विद्यार्थ्यांकरिता निश्चित केलेल्या त्याच्या कुटूंबाची (दोन्ही पालकांचे एकत्रित) उत्पन्न मर्यादा ही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे

आवश्यक असून उत्पन्न प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांचे असावे.

३८) अर्जदार विद्यार्थी हा प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत खातरजमा करुन त्या विद्यार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑन-लाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑन-लाईन अर्ज सक्षम अधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

३९) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियामक प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने / शिक्षण मंडळाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठ/शिक्षण मंडळाकडे नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या पात्र विदयार्थ्यांचे आधारसंलग्नित बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीव्दारे सहा महिन्याचे पट पडताळून त्यानुसार प्रमाणित केल्यानंतर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. तसेच आधार संलग्नित बायोमेट्रीक उपस्थित प्रणाली ही महाडीबीटी पोर्टलला जोडण्याकरीता आवश्यक असलेली संगणकीय प्रणाली माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित करावी.

४०) वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ऑन-लाईन अर्जाची विहित पध्दतीने रितसर छाननी झाल्यानंतर त्यास वरील संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार पात्र लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्याची रक्कम ही थेट स्वरुपात लाभार्थ्याच्या आधार संलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात येईल.

४१) याप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर करण्यात येणारी अनुज्ञेय शिक्षण शुल्काची रक्कम ही दोन हप्त्यांमध्ये लाभार्थी विद्यार्थ्यास देण्यात येईल. त्यापैकी सक्षम प्राधिकाऱ्याकडून पहिला हप्ता हा संबंधित शैक्षणिक वर्षातील ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत व उर्वरित दुसरा हप्ता फेब्रुवारी अखेरपर्यंत लाभार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात जमा करण्यात येईल.

४२) तथापि, उपरोक्त मुदतीपूर्वी महाविद्यालय/ तंत्रनिकेतन यांनी सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस वरीलप्रमाणे DBT व्दारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालय/ तंत्रनिकेतनास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्याची असेल.

४३) तसेच या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अदा करतेवेळी प्रत्येक टप्प्यावर अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची त्याचा अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी संबंधित शैक्षणिक संस्थेस व संबंधीत संचालनालयास महाडीबीटी पोर्टलव्दारे उपलब्ध करुन

देण्याची कार्यवाही माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून करण्यात यावी. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे या यादीतील नमूद पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना महाविद्यालय/तंत्रनिकेतनात प्रवेशाच्या वेळी कोणतीही अडचण येणार नाही याची खात्री संबंधित महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी घ्यावी.

४४) तसेच अभ्यासक्रम व संस्थानिहाय सदर पात्र लाभार्थ्यांची यादी ही अंमलबजावणी करणाऱ्या संचालनालयाने देखील त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल. तथापि, संबंधित इच्छुक अर्जदारांनी नमूद केलेल्या त्यांच्या आधार क्रमांकासंदर्भात व त्यांच्या अन्य वैयक्तिक खाजगी स्वरुपाची माहिती ही सार्वजनिक होणार नाही, याची योग्य ती खबरदारी घेण्यात यावी.

४५) महाविद्यालये / तंत्रनिकेतन यांचेकडून इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांच्या ऑन-लाईन अर्जाची छाननी करतांना त्या विद्यार्थ्याच्या सत्रनिहाय उपस्थितीचा व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सत्र / वार्षिक परीक्षेबाबतचा तपशिल तपासून सादर करणे आवश्यक असेल व याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालय/ तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांची असेल. तथापि, प्रथम सत्रामध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या पहिल्या हप्त्याच्या रकमेसाठी विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती व परीक्षेबाबतची माहिती विचारात घेण्यात येऊ नये. परंतु त्यापुढील सर्व सत्राकरीता उर्वरित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यापूर्वी त्या विद्यार्थ्याची लगतपूर्वीच्या सत्रातील आधारसंलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीव्दारे नोंदविलेली किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व लगतपूर्वीच्या सत्र परीक्षेस बसला असल्याची खात्री करणे आवश्यक असेल.

<u>अन्य महत्वपूर्ण बाबी :-</u>

४६) यापूर्वी संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदर प्रयोजनार्थ सर्व विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ/ स्वायत्तता प्राप्त महाविद्यालये/तंत्रनिकेतन यांनी प्रत्येक प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करताना त्यांचा आधार क्रमांक हा संबंधित विद्यापीठ/मंडळाच्या संलग्नीत महाविद्यालय / तंत्रनिकेतनाच्या unique सांकेतिक क्रमांकाशी (AISHE/School Code अथवा विद्यापीठ/ मंडळाने दिलेला नोंदणीकृत क्रमांक) जोडून त्या आधारे विकसित केलेली शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांची व महाविद्यालयाचे शिक्षण शुल्काबाबतची अभ्यासक्रमनिहाय परिपूर्ण माहिती (Data base) ही महाडीबीटी पोर्टलशी जोडण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयास संबंधित प्रशासकीय विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात यावी.

४७) सदर प्रयोजनार्थ प्रत्येक योजनेकरीता संबंधित संचालनालय/आयुक्तालय यांनी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेत एक संयुक्त खाते उघडून त्याव्दारे लाभार्थी विद्यार्थ्यांना

शिष्यवृत्ती माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल मार्फत अदा करण्याची कार्यवाही करावी. वरील नमूद खात्याव्यतिरिक्त इतर कोणतेही खाते (जिल्हा/ तालुका/ विभाग स्तरावर) ठेवण्यात येऊ नये.

४८) विविध प्रशासकीय विभागांच्या अखत्यारितील कोणते अभ्यासक्रम व्यावसायिक किंवा बिगर व्यावसायिक आहेत याबाबतची माहिती ही प्रस्तावित शासन निर्णयासोबत जोडण्यात येणाऱ्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आली आहे. तथापि, यासंदर्भात बदल करावयाचा असल्यास त्याअनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांचेशी संबंधित अधिनियमातील तरतूदी किंवा केंद्र शासनाच्या शिखर परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे शासन मान्यतेने करावी.

४९) सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांच्या अखत्यारितील संचालनालयाच्या/आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/तंत्रनिकेतनांमध्ये स्थापित करावयाच्या आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीकरीता येणारा खर्च हा त्यांच्या स्वीय प्रपंची लेख्यामधून (पीएलए) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५०) सदर योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात आवश्यकतेनुरुप बदल करणे अथवा रद्द करणे अथवा नव्याने एखादया अभ्यासक्रमाचा समावेश करण्याकरीता किंवा या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम सद्य:स्थितीत अकृषी विद्यापीठात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले असले तरी या अभ्यासक्रमांचा आवश्यकतेनुरुप समावेश करण्याबाबत उचित निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखालील अपर मुख्य सचिव (वित्त), प्रधान सचिव (कृषी /पदुम), प्रधान सचिव (शालेय शिक्षण), सचिव (सामाजिक न्याय), सचिव (आदिवासी विकास) आणि सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांचा समावेश असलेल्या सचिवस्तरीय प्रदत्त समितीला (Empowered Committee) अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

५१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे पारदर्शी पध्दतीने काटेकोररित्या अंमलबजावणी करण्यासाठी विविध बाबींकरीता येणारा प्रशासकीय खर्च हा वरील संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार भागविण्यात यावा.

५२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षण संचालनालय, कला संचालनालय व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पात्र अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, परीक्षा शुल्क आणि निर्वाह भत्ता देण्यासाठी सदर योजनेंतर्गत अनुक्रमे संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, संचालक, कला संचालनालय आणि संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांना संनियंत्रण व समन्वयक

अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच उच्च शिक्षण आणि तंत्र शिक्षण संचालनालयांच्या नियंत्रणाखालील विभागीय सहसंचालक यांना या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

५३) सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शुल्क शिष्यवृत्ती बाबत विविध विभागांच्या अखत्यारीतील सर्व सक्षम प्राधिकारी किंवा नेमून दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधीद्वारे वेळोवेळी दरवर्षी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह संनियंत्रण व समन्वयक अधिकाऱ्यांनी निर्गमित कराव्यात. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

